खडकपूर्णा धरणातून अवैध वाळू उपसा, वाहतूक करणाऱ्या १५ बोटी जिलेटिनद्वारे उद्ध्वस्त >> पान 2
जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आरोग्य विभागाचा आढावा >> पान 3
कृषी विभागातील आत्मा कर्मचाऱ्यांवर अन्याय यांचा वनवास संपणार कधी ? >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ



लाइव्ह कॉन्सर्टदरम्यान सिंगर मोनाली ठाकूरची तब्येत बिघडली, तातडीने रुग्णालयात दाखल! आतील पान

**सुविचार**
विचारांची खोली ही खऱ्या बुद्धिमत्तेची ओळख आहे.

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034
■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई
■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 163 ■ शुक्रवार, दि. 24 जानेवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## आरोपी वाल्मिक कराडला मध्यरात्री जिल्हा रुग्णालयात केलं दाखल

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडला न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी ठोठावली आहे. या प्रकरणी वाल्मिक कराड याला जिल्हा कारागृहात ठेवण्यात आलं आहे. मात्र बुधवारी मध्यरात्री वाल्मिक कराडच्या पोटात दुखू लागल्यानं त्याला उपचारासाठी बीड जिल्हा रुग्णालयात मध्यरात्री एक वाजता दाखल करण्यात आलं. यावेळी त्याच्यावर उपचार करण्यात आले. मात्र प्रकृती नाजूक असल्यानं त्याच्यावर बीडच्या जिल्हा रुग्णालयातील आयसीयुमध्ये उपचार सुरू करण्यात आले आहेत. बुधवारी बीड जिल्हा सत्र न्यायालयात मकोका अंतर्गत व्हिडिओ कॉन्फरन्सींगनं सुनावणी घेण्यात आली. यामध्ये वाल्मिक कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आली आहे.

वाल्मिक कराडनं दोन कोटीची खंडणी मागितल्याचा आरोप : आवादा कंपनीच्या मॅनेजरला दोन कोटीची खंडणी मागितल्याचा आरोप वाल्मिक कराडवर करण्यात आला. या संदर्भात ही सुनावणी घेण्यात आली. न्यायालयानं वाल्मिक कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्यामुळे आता येणाऱ्या १४ दिवसांच्या कोठडीनंतर काय कारवाई होते, हे पाहणं तितकंच महत्त्वाचं ठरणार आहे.

## राम गोपाल वर्मा यांना कोर्टाने सुनावली तुरुंगवासाची शिक्षा, अजामीनपात्र वॉरंट जारी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूडमधील नावाजलेले चित्रपट दिग्दर्शक राम गोपाल वर्मा अडचणीत सापडले आहेत. त्यांना मुंबईतील एका न्यायालयाने चेक बाऊन्स प्रकरणात दोषी ठरवलं असून तीन महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. अंधेरी मॅजिस्ट्रेट कोर्टाने चेक बाऊन्स प्रकरणी मंगळवारी हा निकाल दिला. मागील सात वर्षापासून या खटल्याची सुनावणी सुरू होती. कोर्टाने हा निकाल सुनावला तेव्हा वर्मा न्यायालयात हजर नव्हते.

अंधेरी कोर्टातील दंडाधिकाऱ्यांनी वर्मा यांना ३ महिने तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. तसेच ते गैरहजर राहिल्याने त्यांच्या अटकेसाठी अजामीनपात्र वॉरंट जारी करण्याचे आदेशही दिले. राम गोपाल वर्मा यांना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट्स कायद्याच्या कलम १३८ अंतर्गत दोषी ठरवून शिक्षा सुनावण्यात आली. खात्यात पुरेसे पैसे नसल्याने चेक बाऊन्स झाल्यास या कलमांतर्गत कारवाई केली जाते.

याप्रकरणी तीन महिन्यांच्या आत तक्रारकर्त्याला ३.७२ लाख रुपयांची नुकसानभरपाई द्या, असे आदेश कोर्टाने दिले. जर ते नुकसानभरपाई देऊ शकले नाही, तर त्यांना आणखी तीन महिने तुरुंगवास भोगावा लागेल. वर्मा यांच्या विरोधात अजामीनपात्र वॉरंट जारी करण्याचे आदेश दिल्याने पोलीस त्यांना अटक करण्याची शक्यता आहे.

## बांग्लादेशी महिलेला लाडकी बहीणचा लाभ, मुंबईतून ५ जणांना अटक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी :** अलीकडच्या काळात बांगलादेशी नागरिकांनी भारतात बेकायदेशीर शिरकाव केल्याच्या अनेक बातम्या समोर आल्या आहेत. काही दिवसांपूर्वी पुण्यातून एका बांगलादेशी नागरिकाला पुणे पोलिसांनी अटक केली होती. संबंधित आरोपी मागच्या २० वर्षापासून भारतात वास्तव्याला असल्याचे समोर आले होते. आरोपीने बेकायदेशीरपणे भारत बांगलादेशची सीमा ओलांडली होती. यानंतर त्याने कोलकात्यात जन्म दाखला तयार करून घेतला होता. यानंतर तो अहमदाबाद आणि मुंबईवरून पुण्यात आला होता. मुंबईसह, ठाणे आणि भिवंडीत देखील बांगलादेशी नागरिक बेकायदेशीर वास्तव्य करत असल्याचे समोर आले होते. संबंधित आरोपींकडे भारतीय आधारकार्ड, पॅनकार्ड, पासपोर्स अशी कागदपत्रे देखील आढळून आले होते.

हे कमी होते म्हणून की काय आता मुंबईत एका बांगलादेशी महिलेने लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुंबईतील कामाठीपुरा परिसरात वास्तव्याला असणाऱ्या बांगलादेशी महिलेने लाडकी बहीण योजनेसाठी अप्लाय केले होते. सरकारकडून तिला लाभही देण्यात आला आहे. मुंबई पोलिसांच्या कारवाईमध्ये ही धक्कादायक माहिती उघड झाली आहे.

# 'जखमी वाघ काय असतो, अन्...', शाहांचा अब्दाली उल्लेख करत ठाकरेंचं ओपन चॅलेंज

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त गुरुवारी अंधेरी येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर उद्धव ठाकरे यांनी मेळावा घेतला. या सभेतून उद्धव ठाकरे यांनी आगामी निवडणुका स्वबळावर लढण्याचे संकेत दिले आहेत. दरम्यान त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर जोरदार टीकास्त्र सोडलं आहे. जखमी वाघ काय असतो आणि त्याचा पंजा काय असतो, हे भविष्यात दिसेल, अशा शब्दांत उद्धव ठाकरे यांनी अमित शाह यांना ओपन चॅलेंज दिलं आहे.

सभेला उपस्थित असलेल्या शिवसैनिकांना संबोधित करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, निवडणुकीच्या निकालानंतर पहिल्यांदाच आपण समोरासमोर भेटत आहोत. आजपर्यंत २३ जानेवारीचा दिवस म्हणजेच बाळासाहेबांचा जन्म दिवस हा आपण षण्मुखानंद हॉलमध्ये साजरा करत होतो. पण मला किती लोकांचा पाठिंबा आहे, हे दाखवून देण्यासाठी मुद्दाम ही सभा आयोजित केली आहे. दोन महिन्यांपूर्वी निवडणुकांचा जो काही निकाल लागला, मला तो पटलेला नाही असं उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.

तसंच मध्ये अब्दाली येऊन गेले, हे अब्दाली कोण आहेत, तुम्हाला माहीत आहे अमित शाह. त्यांनी सांगितलं की महाराष्ट्रातला विजय उद्धव ठाकरेंना जागा दाखवणारा आहे. पण जखमी वाघ काय असतो आणि त्याचा पंजा काय असतो, ते तुम्हाला भविष्यात दिसेल असं



म्हणत उद्धव ठाकरेंनी बाळासाहेब ठाकरेंच्या जयंती निमित्त आयोजित मेळाव्यातून अमित शाह यांना उत्तर दिलं आहे.

मराठी माणसाच्या नादी लागू नका, जिथे औरंगजेबाला या महाराष्ट्राने झुकवलं तिथे अमित शाह किस झाड की पत्ती? मी मुद्दाम जाहीर सभा घेतली. कारण म्हटलं कळू तरी द्या की माझ्याबरोबर किती लोक राहिले आहेत? अमित शाह तुम्ही माझी जागा ठरवू शकत नाही. कारण माझी जागा ठरवणारी बाळासाहेब ठाकरेंनी दिलेली ही माझी शिवसैनिकांची संपत्ती आहे. जे शिवसेनाप्रमुख बोलायचे की जोपर्यंत तुम्ही शिवसैनिक तोपर्यंत शिवसेनाप्रमुख आहे, तेच मी सांगतो आहे जोपर्यंत तुम्ही आहात तोपर्यंत मी तुमचा पक्ष प्रमुख आहे. गद्दारांनी वार केले तर हा उद्धव ठाकरे संपणार नाही. गद्दारांना गाडूनच मी संपेन अशी गर्जना उद्धव ठाकरेंनी केली.

## 'बाळासाहेबांची नाक घासून माफी मागायला हवी होती' शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर घणाघाती प्रहार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** 'जे बाळासाहेबांच्या विचाराचे मारक ते काय बांधणार स्मारक. बाळासाहेबांच्या स्मारकात जाण्याआधी त्यांनी बाळासाहेबांची नाक घासून माफी मागायला हवी होती. खुर्चीसाठी त्यांनी बाळासाहेबांचे विचार पायदळी तुडवले त्यांच्या कडून काय, अपेक्षा करायची' असं म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती दिनी शिवसेनेनं मुंबईतल्या वांद्रे-कुर्ला संकुलात शिवोत्सव मेळावा आयोजित केला . या मेळाव्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह प्रमुख नेते हजर होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षांचा कार्यकाळ आणि महायुती सरकारच्या विजयाबद्दल भरभरून बोलले.

आयुष्यभर संघटना वाढवण्यासाठी काम करेल, बाळासाहेबांचे विचार ज्यांनी सोडले त्यांची परिस्थिती बघा. सहनही



होत नाही, सांगता ही येत नाही, अशी अवस्था झाली आहे. शिवसेना व धनुष्यबाण वाचवण्याचे काम तुम्ही केले. जनतेने त्यांचा उरला सुरला नक्षा उतरवला आहे. आपण बाळासाहेबांच्या प्रेरणेमुळे शिवसेना सुरक्षित ठेवली. ते म्हणतात आता स्वबळावर निवडणूक लढू,पण त्यासाठी मनगटात ताकद लागते, घरात बसून लढता येत नाही. त्यासाठी कार्यकर्त्यांसोबत रस्त्यावर उतरून काम करावे लागते. जे बाळासाहेबांच्या विचाराचे मारक ते काय बांधणार स्मारक. बाळासाहेबांच्या स्मारकात जाण्याआधी त्यांनी बाळासाहेबांची नाक घासून माफी मागायला हवी होती. खुर्चीसाठी त्यांनी बाळासाहेबांचे विचार पायदळी तुडवले त्यांच्या कडून काय, अपेक्षा करायची, अशी टीकाही शिंदेंनी थेट उद्धव ठाकरेंवर केली.

हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जयंती आहे. त्यानिमित्ताने आपण जगलो आहे. त्यांना वंदन करतो. त्यांच्या चरणी नतमस्तक होतो लोकसभेपाठोपाठ आपण विधानसभेत ऐतिहासिक विजय मिळवला. बाळासाहेबांच्या धगधगत्या आणि प्रेरणेने, विचाराने व उर्जेने घडलेलो शिवसैनिक आहोत. त्यांचा विचार कधी सोडला नाही, म्हणून दणदणीत विजय मिळवला अडीच वर्षांपूर्वी केलेला उठाव आणि त्यानंतर मिळालेला विजय दैदिप्यमान आहे की या विजयाची चर्चा देशभरात आहे. या विजयाची आठवण अनेक पिढ्या ठेवतील, हे यश बाळासाहेबांच्या विचाराचे आहे. महायुतीच्या एकजुटीचे आहे, असं यावेळी शिंदे म्हणाले.

विकास कामे तिप्पट चौपट वेगाने केली. कल्याणकारी योजना केल्या. या दोन्हीची सांगड घातली म्हणून जनतेने विश्र्वास दाखवला मायबाप जनताजनार्दनासमोर नतमस्तक होतो. विजयाची गुलाल उधळणाऱ्या नेत्यांचा सत्कार झाला, त्यांना शुभेच्छा देतो

बाळासाहेबांच्या जयंतीला मिळालेले हे एक मोठे गिफ्ट आहे. बाळासाहेब आज असते तर त्यांनी पाठ थोपटली असती बाहेरून आल्यावर आई जशी दृष्ट काढते आणि आनंद वाटतो. तसा आनंद आज वाटतोय' असं म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवोत्सव मेळाव्यावर कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं.

## नितीन गडकरींच्या अल्टिमेटमला कंत्राटदारानं दाखवली केराची टोपली, नागपूर विमानतळाचं काम अपूर्णच

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय नागपूर विमानतळातील धावपट्टीच्या रिकार्पेटिंगचं काम महिनाभरात पूर्ण करण्याचा अल्टिमेटम केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दिला होता. मात्र, महिनाभराचा कालावधी पूर्ण होऊन देखील धावपट्टीच्या रिकार्पेटिंगचं काम आद्यपही अपूर्णच आहे. त्यामुळं आता याप्रकरणी नितीन गडकरी काय कारवाई करणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



विमानतळाच्या धावपट्टीच्या रिकार्पेटिंगचं काम केवळ ६० टक्केचं पूर्ण झालय. तर संपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी ३१ मार्च पर्यतची मुदत मिळावी, अशी मागणी रिकार्पेटिंगचं काम करत असलेल्या के जी इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीनं केलीय. मुळात काम वेळेत पूर्ण होण्यासाठी दररोज सकाळी दहा ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत 'रन-वे' बंद ठेवण्याचं ठरवण्यात आलं होतं. मात्र, अनेक विमानांचं आकस्मिक उड्डाण आणि लॅडिंगसाठी गेल्या २ महिन्यात वारंवार काम बंद करावं लागलं. तसंच व्हीव्हीआयपी मुव्हमेंटसाठी सकाळी दहा ते संध्याकाळी सहाच्या दरम्यान अनेकवेळा काम बंद करावं लागतं. त्यामुळं रिकार्पेटिंगचं काम वेळेत होऊ शकलं नसल्याचं सांगितलं जातय.

विमानतळातील धावपट्टीच्या रिकार्पेटिंगचं काम करण्यासाठी कॉंक्रीटची आवश्यकता आहे. मात्र, या कामासाठी आवश्यक हॉट मिक्स प्लांट हा धावपट्टीपासून लांब आहे. रिकार्पेटिंगसाठीचं साहित्य आणण्यासाठी देखील बराच वेळ जातो. त्यामुळं आता काम करणाऱ्या कंपनीला अतिरिक्त क्षमतेचा हॉट मिक्स प्लांट सुरू करण्याची परवानगी, देण्यात आली आहे.

गेल्या वर्षी २३ डिसेंबरला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी धावपट्टीची पाहणी केली होती. नवीन धावपट्टीच्या कामाला वेळ लागत असल्यानं गडकरी यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ''एक महिन्याच्या आत हे काम पूर्ण करा, अन्यथा कारवाई करण्यात येईल'', असा अल्टिमेटम गडकरी यांनी संबंधित कंपनीला दिला होता. तसंच कामात उशीर झाल्यानं नागपूरकरांना नाहक त्रास सहन करावा लागला. त्यासाठी त्यांनी दिलगिरी देखील व्यक्त केली होती.

कंपनीला मे २०२४ मध्ये कार्यादेश मिळाल्यावर जून ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्यात आला. त्यानंतर १ ऑक्टोबर २०२४ पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. मात्र, त्यानंतर काही कारणांनी काम बंद होतं. २४ नोव्हेंबरपासून पुन्हा कामाला सुरुवात झाली. पहिल्या लेअरचं काम ८० टक्के पूर्ण झालय. तर दुसऱ्या आणि तिसऱ्या लेअरचं काम पूर्ण होण्यासाठी २१ मे २०२५ पर्यंतचा कालावधी लागेल, असं आता कंपनीकडून सांगण्यात आलय.

## जळगाव रेल्वे अपघातात मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता; अजूनही अनेक प्रवासी बेपत्ता

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात बुधवारी (२२जानेवारी) सायंकाळी परधाडे रेल्वे स्थानकाजवळ घडलेल्या भयंकर अपघातात १३ प्रवाशांचा मृत्यू झाला असून एकूण २५ प्रवासी जखमी झाले आहेत . पुष्पक एक्सप्रेसला आग लागल्याची अफवा पसरली आणि जीवाच्या भीतीने प्रवाशांनी रेल्वेतून उड्या मारल्या .मात्र त्याचवेळी भुसावळकडे जाणाऱ्या कर्नाटक एक्सप्रेसच्या धडकेत प्रवाशांच्या शरीराचे तुकडे झाले .अनेक जण जखमी झाले . अपघाताची माहिती मिळाल्यानंतर मृत आणि जखमी प्रवाशांचे नातेवाईक मुंबईहून जळगावला पोहोचले आहेत . यात अनेक जण बेपत्ता असल्याची माहिती सूत्रांनी दिली असून मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे . पोलीस महसूल विभाग रेल्वे कर्मचारी आणि पाचोरा नगरपालिकेतील कर्मचाऱ्यांकडून रेल्वे अपघात घटनास्थळाची पाहणी करण्यात येत आहे .

# राज्यस्तरीय राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त लोकसभा व विधानसभा निवडणुकीत उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकाऱ्यांचा शनिवारी सत्कार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/ प्रतिनिधी :** महाराष्ट्रामध्ये झालेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणूक आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ मध्ये उत्कृष्ट कार्य केलेल्या अधिकाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. राष्ट्रीय मतदान दिन २०२५ चे औचित्य साधून मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, एम.आय.टी. विद्यापीठ, पुणे आणि जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने हे राज्यस्तरीय पुरस्कार शनिवार, २५ जानेवारी २०२५ रोजी स्वामी विवेकानंद सभागृह, एम.आय.टी. कोथरूड, पुणे येथे प्रदान केले जाणार आहेत.

या कार्यक्रमास राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीसाठी सुकाणू समितीचे अध्यक्ष प्रो.नितीन करमळकर, ऑलिम्पिक महिला नेमबाज तथा सदिच्छादूत राही सरनोबत, भारतीय क्रिकेटपटू केदार जाधव, एव्हरेस्टवीर उमेश झिरपे, अंतराळ उद्योजक श्र्वेता कुलकर्णी, सदिच्छादूत श्रीगौरी सावंत, तृतीयपंथी छायाचित्र पत्रकार झोया लोबो, अमुक-तमूक यूट्यब चॅनेलचे ओंकार जाधव व सावनी वझे आणि खास रे टी.व्हीचे संजय कांबळे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

राष्ट्रीय मतदान दिनानिमित्तच्या या कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना पुरस्कार प्रदान कार्यक्रमाबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रमाचेही आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर मतदार जागृती दालन, सेल्फी पॉईंट, मतदार जागृती खेळ आणि पथनाट्याचाही समावेश करण्यात आला आहे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांना मतदार ओळखपत्राचे वाटप कार्यक्रमाबरोबरच शपथ देण्याचा कार्यक्रम होणार आहे.

राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त लोकसभा तसेच विधानसभा २०२४ मध्ये निवडणूक निर्णय अधिकारी, टपाली मतपत्रिकांची देवाण-घेवाण करण्याचे नियोजन, मतदान साहित्य वाटप करून घेण्याचे नियोजन,




मतदार सुविधा, वार्तांकन पुरस्कार आणि शासकीय भागीदारी यामध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या अधिकाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात येईल, असे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम तसेच अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी डॉ. किरण कुलकर्णी यांनी कळविले आहे.

## डॉ होमी जहांगीर भाभा

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज स्मृतिदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जे चा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

# खडकपूर्णा धरणातून अवैध वाळू उपसा, वाहतूक करणाऱ्या १५ बोटी जिलेटिनद्वारे उद्ध्वस्त

## सिंदखेडराजा, बुलढाणा आणि जालन्यातील पथकाची संयुक्त कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** देऊळगाव राजा तालुक्यातील खडकपूर्णा धरणातून होणाऱ्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीविरोधात कारवाई करण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार सिंदखेडराजा व बुलढाणा उपविभागीय अधिकारी यांचे संयुक्त पथकाने जिल्हास्तरीय शोध पथकाच्या सहाय्याने शिनगाव जहागीर भागात दोन बोटी व इसरूळ व बायगाव शिवारात एक बोट अशा तीन बोटी जिलेटिनच्या सहाय्याने उडविण्यात आल्या आहेत. तसेच शिनगाव येथे बोटीत सापडलेल्या तीन मजुरांवर देखील गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाने दिली आहे.

सिंदखेडराजाचे उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय शोध व





बचाव पथक आणि एनडीआरएफच्या पथकाने शोध मोहीम राबवून खडकपूर्णा धरणात चालणाऱ्या अवैध बोटींवर कारवाई करण्यास सुरुवात केली होती.

या कारवाई दरम्यान सिंदखेडराजा व बुलढाण्याचे पथक जालन्यातील जाफ्राबाद तहसीलदारांच्या पथकाच्या सातत्याने संपर्कात होते. या पथकांनी एकमेकांच्या संपर्कात राहून बुलढाणा जिल्ह्याच्या हद्दीतून जालन्याच्या हद्दीत जाणाऱ्या सहा बोटींसह सहा छोट्या बोटी अशा एकूण बारा बोटी जाफ्राबाद पथकाने पकडून व त्या उध्वस्त केल्या आहेत.

या संयुक्त कारवाईत खडकपूर्णा भागात एकूण तीन तर जाफ्राबाद तालुक्यात बारा अशा एकूण १५ बोटींवर कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईसाठी शोध पथक व जिलेटिनच्या सहाय्य प्रशासनाकडून पुरविण्यात आले होते. यासोबत देऊळगाव राजा व चिखली तहसीलदार यांच्या पथकातील कर्मचारी उपस्थित होते. तसेच या कारवाईत पोलीस विभाग व शोध पथक आणि ड्रोन कॅमेऱ्याचे देखील सहाय्याने घेण्यात आले.

जिल्ह्यातील अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी प्रशासनाची कारवाई सुरुच आहे. याबाबत पोलीस, आरटीओ, महसूल अधिकारी-कर्मचाऱ्यांना यापूर्वीच निर्देश दिले असून त्याप्रमाणे कारवाई केली जात आहे. ही कारवाई करण्यासाठी जाणाऱ्या पथकातील अधिकारी-कर्मचाऱ्यांवरील हल्ले खपवून घेतले जाणार नसून कारवाई निरंतर चालणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

# संतोष देशमुख प्रकरणात न्यायालयानं हस्तक्षेप करावा, अंजली दमानियांचं मुख्य न्यायमूर्तींनाच पत्र, म्हणाल्या, 'धनंजय मुंडेंच्या चौकशीचे आदेश..'

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासाला आता वेग आला आहे .या प्रकरणाचा सूत्रधार असल्याचा आरोप असणाऱ्या वाल्मीक कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आल्यानंतर या प्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळेला वॉन्टेड म्हणून जाहीर करण्यात आलंय .बीडच्या विशेष न्यायालयात काल वाल्मीक कराडला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर करण्यात आले होते . मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असणाऱ्या



वाल्मीक कराड सोबत आर्थिक हितसंबंध ठेवल्याचा आरोप धनंजय मुंडेंवर होत असताना सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मुख्य न्यायमूर्तींना पत्र लिहिलं आहे .संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्यायालयाने हस्तक्षेप करावा .धनंजय मुंडेंवरील आरोपांच्या चौकशीचे आदेश न्यायालयाने द्यावेत अशी मागणी अंजली दमानिया यांनी बुधवारी (२२ जानेवारी )उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अलोक आराध्ये यांना पत्राद्वारे केली .

अंजली दमानिया यांनी मुख्य न्यायमूर्तींना पत्र लिहीत बीड मधील संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी अटकेतील आरोपी वाल्मीक कराडचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धनंजय मुंडे यांची हितसंबंध असल्याचा आरोपही केलाय .बीडच्या परिस्थितीची दखल घेऊन न्यायालयाने या प्रकरणात हस्तक्षेप करावा .वाल्मीक कराड आणि अन्य आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी पाहता त्यांना मुंबईतील कारागृहात ठेवावे .मुंडे यांच्या बेहिशेबी मालमत्तेची एसीबीला चौकशी करण्याचे आदेश द्यावेत अशा मागण्या दमानिया यांनी पत्राद्वारे केल्या आहेत .

अंजली दमानिया यांनी पत्रात काय म्हटलं ?

संतोष देशमुख हत्या प्रकरणात न्यायालयाने हस्तक्षेप करावा, धनंजय मुंडेवरील आरोपांच्या चौकशीचे आदेश न्यायालयाने द्यावेत असं अंजली दमानिया यांनी मुख्य न्यायमूर्तींना पत्र लिहिलंय. बीडमधील संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी अटकेतील आरोपी वाल्मिक कराडचे राष्ट्रीय काँग्रेसचे नेते धनंजय मुंडेंशी हितसंबंध असल्याचा पत्रात आरोप करण्यात आलाय. मुंडे हे लोकप्रतिनिधी असल्याने त्यांच्यावरील या आरोपांच्या चौकशीचे आदेश देण्याची मागणी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बुधवारी उच्च न्यायालयाचे मुख्य न्या. आलोक आराधे यांना पत्राद्वारे केली. त्या म्हणाल्या,संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील अराजकता आणि दहशतीची स्थिती आहे. या हत्या प्रकरणानंतर जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था आणखी ढासळली असून तेथील नागरिक दहशतीखाली आहेत.एक जागरूक नागरिक म्हणून ही स्थिती न्यायालयाच्या निदर्शनास आणून देणे आपली जबाबदारी आहे. त्यामुळे, नागरिकांचा न्यायव्यवस्थेवरील विश्वास कायम राहण्याच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्थेची घडी पुन्हा बसवण्यासाठी न्यायालयाने या प्रकरणी हस्तक्षेप करावा.अशी मागणी दमानिया यांनी मुख्य न्यायमूर्तीकडे केली आहे, आपल्या पत्राचे जनहित याचिकेत रूपांतर करावे अशी मागणी करताना देशमुख हत्या प्रकरणावर देखरेख ठेवण्याची आणि तपासाच्या प्रगतीचा अहवाल दर आठवड्याला सादर करण्याचे आदेश तपास यंत्रणेला देण्याची मागणीही दमानिया यांनी केली आहे..

धनंजय मुंडेंची चौकशी करण्याची मागणी

धनंजय मुंडे सत्ताधारी पक्षाचे असून यांच्यावरील आर्थिक गैरव्यवहारांच्या आरोपांची निवडणूक आयोगानेही चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच, चौकशी पूर्ण होईपर्यंत मुंडे यांना लोकप्रतिनिधी दूर ठेवणे गरजेचे असल्याची मागणी दमानिया यांनी पत्रात केली आहे.तसेच बीडमधील परिस्थितीची दखल घेऊन तेथील स्थिती सुधारण्यासाठी न्यायालयाने हस्तक्षेप करून देशमुख हत्या प्रकरणाची सुनावणी निष्पक्ष होण्यासाठी खटला मुंबईतील न्यायालयात वर्ग करण्यात यावा. वाल्मिक कराड आणि अन्य आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी पाहता त्यांना मुंबईतील कारागृहात ठेवावे. तसेच, त्यांना व्हिसीमार्फत न्यायालयात हजर करावे. देशमुख हत्येच्या तपासावर न्यायालयाने देखरेख ठेवावी.मुंडे यांच्या बेहिशेबी मालमत्तेची एसीबीला चौकशी करण्याचे आदेश द्यावेत. तर वाल्मिक कराड आणि त्यांचे कुटुंबीयांच्या बेहिशेबी संपत्तीची चौकशी करण्याचे आदेश सक्तवसुली संचालनालयाला (ईडी) देण्याच्यासारख्या मागण्या दमानिया यांनी पत्राद्वारे केल्या आहेत.

## लाइव्ह कॉन्सर्टदरम्यान सिंगर मोनाली ठाकूरची तब्बेत बिघडली, तातडीने रुग्णालयात दाखल!

**मुंबई/प्रतिनिधी :** प्रसिद्ध गायिका मोनाली ठाकूरच्या लाईव्ह परफॉर्मन्समध्ये एक चिंताजनक घटना घडली. लाईव्ह परफॉर्मन्समध्ये अचानक गायिकेला श्वास घेण्यास त्रास जाणवू लागला. त्यामुळे तिला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. सध्या ती रुग्णालयात असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

''सवार लूं'' आणि ''मोह मोह के धागे'' यांसारख्या हिट गाण्यांसाठी प्रसिद्ध असलेली पार्श्वगायिका दिनहाटा महोत्सवात कार्यक्रम करत होती. तिला अचानक श्वास घ्यायला त्रास होऊ लागला. कार्यक्रमातील उपस्थित असलेल्या लोकांनी सांगितले की मोनाली ठाकूरला श्वास घेण्यास त्रास होऊ लागला. तीव्र त्रासात असल्याचे ती दिसून आली आणि त्यांनी ताबडतोब शो थांबवला आणि त्रास होत असल्याचे सांगितले.

प्रकृती खालावल्याने मोनालीला तातडीने दिनहाटा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिच्या टीमने त्वरीत हस्तक्षेप केला आणि वैद्यकीय मदतीसाठी कॉल केला. काही मिनिटांतच एक रुग्णवाहिका आली आणि गायिकेला त्वरीत जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. सध्या तिच्यावर तेथे उपचार सुरू आहेत.

कॉन्सर्टचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता, ज्यामध्ये मोनाली असे म्हणताना दिसली होती की, ''मी निराश झालो आहे की माझी टीम आणि मी येथे परफॉर्म करण्यासाठी खूप उत्सुक होतो. सुविधा आणि त्याची स्थिती याबद्दल बोलू नका, कारण ती व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. आम्ही खूप प्रयत्न करत होतो कारण मी तुम्हा सर्वांना उत्तरदायी आहे आणि तुम्ही माझ्यासाठी आलात, बरोबर? तर, या सगळ्यासाठी तुम्ही मला जबाबदार धराल. आम्हाला हा शो बंद करावा लागला याबद्दल मी मनापासून माफी मागते, परंतु मी निश्चितपणे परत येणार आहे.

# नेपाळचं कुटुंब अस्थी घेण्यासाठी रेल्वे रुळावर पोहचलं; एकाचं फक्त शिर मिळालं, जळगावमध्ये काय घडतंय?

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यात बुधवारी (२२जानेवारी) सायंकाळी परधाडे रेल्वे स्थानकाजवळ घडलेल्या भयंकर अपघातात १३ प्रवाशांचा मृत्यू झाला असून एकूण २५ प्रवासी जखमी झाले आहेत. तसेच या अपघातामधील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. कारण अजूनही अनेक प्रवाशी बेपत्ता असल्याची माहिती मिळत आहे.

जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात आतापर्यंत सात मृतांचं शवविच्छेदन झालेलं आहे. या सर्व मृतदेहांवर रासायनिक प्रक्रिया करून मृतदेह पोलिसांच्या स्वाधीन केले जातील आणि त्यानंतर ते नातेवाईकांना सुपूर्द करतील. अनेक मृतदेह दूरचे असल्याने जवळपास पाच ते सहा दिवस त्यांच्या गावी जाण्यासाठी लागू शकतात. त्यामुळे सर्व मृतदेहांवर रासायनिक प्रक्रिया करूनच मृतदेह नातेवाईकांकडे देण्यात येतील. तर अपघातातील एका प्रवाशाचे केवळ शिर मिळून आले, मात्र धड अद्याप मिळालेले नाही. त्याच्या धडाचा शोध घेण्यासाठी रेल्वे पोलिसांनी श्वान पथकाची मदत घेऊन





घटनास्थळी शोध घेण्याचं काम सुरू केले आहे.

नेपाळचं कुटुंब अस्थी घेण्यासाठी घटनास्थळी-

जळगावमधील रेल्वे अपघातामध्ये नेपाळमधील कमला भंडारी या महिलेचा देखील मृत्यू झाला. कमला भंडारी यांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळताच त्यांचा मुलगा तपेंद्रा आणि सून हे दोघेही घटनास्थळी येऊन त्यांनी अस्थी आणि मयत आईचे कपडे घेऊन गेले आहेत. भारत सरकारने मृतदेह नेपाळपर्यंत पोहचवण्याची सुविधा करून द्यावी, अशी मागणी ही कुटुंबीयांनी केली आहे. दरम्यान, कमला भंडारी यांच्यासोबत त्यांच्या सून होत्या. अपघात झाल्यानंतर घटनास्थळावर सासू कमला भंडारी यांना सावरताना चोरट्यांनी त्यांचा मोबाइल, पर्स व त्यातील पैसे चोरून नेले. याशिवाय अनेक प्रवाशांचे पैसे व बॅगा लांबविण्यात आल्याचे सांगण्यात आल्याची माहिती समोर आली.

मृतांची नावे पुढीलप्रमाणे :

१. कमला नवीन भंडारी (४३, नेपाळ, हल्ली मुक्काम कुलाबा ),
२. लच्छीराम खमू पासी (४०, नेपाळ)
३. इम्तियाज अली (३५, उत्तरप्रदेश)
४. नसरुद्दीन बद्रुद्दीन सिद्दीकी (१९, उत्तरप्रदेश)
५. जवकला भटे जयकडी (८०, नेपाळ)
६. हिनू नंदराम विश्वकर्मा (१०, नेपाळ)
७. बाबू खान (२७ वर्षे, उत्तरप्रदेश)

जखमींची नावे पुढीलप्रमाणे :

१. अबू मोहम्मद (३०, तालबाघौडा, जि. श्रावस्ती, उत्तर प्रदेश)
२. हकीम अन्सारी (४५, तिलवार रतनपूर, जि. श्रावस्थी, उत्तर प्रदेश)
३. हसन अली (१९, गिलोला, जि. बहराइच, उत्तर प्रदेश)
४. विजयकुमार गौतम (३३, बेलपूर बगई, जि. बहराइच, उत्तर प्रदेश)
५. उत्तम हरजन (२५, बेलपूर बगई, जि. बहराइच, उत्तर प्रदेश)
६. मोहम्मद निब्बर (३१, डिकौली, जि. श्रावस्थी, उत्तर प्रदेश)
७. उजाला सावंत (३८, अछाम, जि. मंगलसेन, नेपाळ)
८. दिपक थापा (१८, दुल्लू (नगरपालिका) जि. दहिलोक, नेपाळ)
९. धर्म बहादूर सावंत (८, अछाम, जिल्हा. मंगलसेन, नेपाळ)
१०. मंजू परिहार (२५, दुल्लू (नगरपालिका) जि. दहिलोक, नेपाळ)

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...


### नवी मुंबईतील बांगलादेशी नागरिकांवर पोलिसांची कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता सैफ अली खान याच्यावर हल्ला करणारा बांगलादेशी असल्याचे समोर येताच नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे क्शन मोडवर आले आहेत. बांगलादेशी नागरिकांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली जात आहे. नवी मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणात बांगलादेशी राहताना दिसून येत आहेत शहरात झोपड्या, अनधिकृत बांधकामांमध्ये बांगलादेशींना आश्रय मिळत असल्याचे चित्र पोलिसांच्या कारवायांमधून समोर येत आहे. बनावट पॅनकार्ड, आधारकार्ड वापरले जाते. तसेच महिनाभरामध्ये १२५ जणांना अटक करण्यात आली तसेच ३०० जणांचे कागदपत्र तपासण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे कागदपत्र बनावट आढळून आले तर त्यांच्यावर सुद्धा कारवाई केली जाणार आहेत. आतापर्यंत ५० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

### हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त शिवसेनेच्यावतीने अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त शिवसेना शिंदे गटाच्यावतीने अभिवादन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस जिल्हाप्रमुख सुजित चव्हाण यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### पनवेल तालुक्यातील विचुंबे येथे गुटख्याचा मोठा साठा जप्त; अन्न व औषध प्रशासन व खांदेश्वर पोलीसांची कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**पनवेल/प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील विचुंबे येथे गुटख्याचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. आज सकाळी जवळपास साडे सातच्या सुमारास विचूंबे परिसरात काही अवैध गोष्टी घडत असल्याची माहिती गुप्त बातमीदारांच्या माध्यमातून मिळाली त्या अनुषंगाने पोलीस प्रशासन व अन्न नागरिक औषध प्रशासन यांच्या माध्यमातून या ठिकाणी धाड टाकण्यात आली त्या ठिकाणी तपास केला असता मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा आढळून आला सध्या महाराष्ट्रात गुटखा बंदी असल्याने असा साठा ठेवण्यास कायद्याच्या दृष्टीने मज्जाव आहे. ही कारवाई अन्न व औषध प्रशासन व खांदेश्र्वर पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली. पनवेल मधील विचुंबे गावात एका चाळीतल्या खोलीमध्ये आढळून आलेला २० लाख ६ हजार किंमतीला गुटखा जप्त करण्यात आला आहे. यामध्ये एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुटखा पान मसाला अशा तंबाखू युक्त पदार्थ मिळून आतापर्यंत जवळपास २८ लाखांचा मुद्देमाल व माल पोचवण्यासाठी वापरण्यात आलेल्या दुचाकी देखील जप्त करण्यात आली आहे.

### अदानीविरोधात कुर्लावासीय रस्त्यावर; मदर डेअरीचा जागा धारावीसाठी देण्यास तीव्र विरोध

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईष्ठधारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत मुलुंड, कुर्ला,अक्सा आणि अन्य ठिकाणच्या जागा नाममात्र दरात धारावी पुनर्विकास प्रकल्पास (डीआरपी) दिल्या जात आहेत. कुर्ल्यातील मदर डेअरीची काही एकर जागा धारावीसाठी देण्यास कुर्ल्यातील रहिवाशांचा तीव्र विरोध आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आरोग्य विभागाचा आढावा

## कार्यतत्पर राहून आरोग्य यंत्रणेने काम करावे - डॉ. किरण पाटील

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आपात्कालीन परिस्थितीमध्ये आरोग्य सुविधा तातडीणे पोहचणे गरजेचे असतात. यासाठी जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणेने नेहमी कार्यतत्पर राहून चांगली आरोग्य सेवा द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिले.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिजाऊ सभागृहात आरोग्य विभागाचा आढावा घेतांना ते बोलत होते. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.कै. उ. झिने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी तसेच सहायक संचालक आरोग्य सेवा, सर्व तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिक्षक आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले की, राष्ट्रीय व राज्य महामार्ग, रेल्वे लाईन तसेच अतिसंवेदनशील ठिकाणी अपघात किंवा आपातकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास अशावेळी आरोग्य सुविधा तातडीने पोहोचणे आवश्यक असतात. यासाठी आरोग्य यंत्रणा सदैव तत्पर असावे. अपघात किंवा आपात परिस्थिती निर्माण होण्याऱ्या ठिकाणी रुग्णवाहिका, रुग्णालयातील बेड, ऑक्सीजन, औषधी, रक्त उपलब्धता आदी मुलभुत आरोग्य सोयीसुविधा सज्ज ठेवावे. आरोग्य विभागाने नेहमी अपडेट राहण्यासाठी प्रशिक्षणच्या कार्यशाळा नियमितपणे घ्याव्यात. यासाठी प्रत्येक भागात एक किंवा दोन तज्ज्ञ डॉक्टरांच्या नेतृत्वात समितीचे गठण करावे. दैनंदिन कामाच्या व्यतिरिक्त त्या-त्या विषयातील तज्ज्ञ डॉक्टर इतरांना मार्गदर्शन करतील, याचे नियोजन करावे.

आरोग्य संस्थेमध्ये बाळंतपण झालेल्या महिलांना १०२ क्रमांकाच्या गाडीतून घरपोच पोहचविण्याचे प्रमाण वाढवा. हे उद्दिष्ट १०० टक्केच असले पाहिजे. जिल्ह्यात मातामृत्यु-बालमृत्युचे प्रमाण कमी करण्यासाठी जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी यांनी उपाययोजना राबवावी. तसेच आशावर्कर व अंगणवाडी सेविकामार्फत नवजात बालकांच्या आरोग्याची नियमित माहिती घेऊन लसीकरण होत असल्याची खात्री करावी. तालुका व ग्रामस्तरावर कुष्ठरोग जनजागृती करण्यासाठी दि. ३० जानेवारी ते १३ फेबुवारी २०२५ या पंधरवाड्यात विविध आरोग्य शिक्षणाचे कार्यक्रम राबवावे, असेही निर्देश डॉ. पाटील यांनी दिले.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील लसीकरण मोहीम, महिलांची हिमोग्लोबीन तपासणी, मातामृत्यु प्रमाण, बालमृत्यु प्रमाण, जन्मदर-मृत्युदर, जननी सुरक्षा योजना, कुटुंब नियोजन कार्यक्रमाची अंमलबजावणी, जननी शिशु सुरक्षा योजना, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय कुष्ठरोग नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, सिकलसेल नियंत्रण, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, मोबाईल मेडीकल युनीट, १०८ रुग्णवाहिका आदी विषयांचा आढावा घेतला.

## ढाणकी नगर अध्यक्ष यांनी दिला पाच वर्षाचा लेखा जोखा; पत्रकार परिषद मध्ये दिला आढावा

दैनिक आपला विदर्भ

**ढाणकी/प्रतिनिधी :** ढाणकी येथील प्रथम लोकनियुक्त नगर अध्यक्ष सुरेश जयस्वाल यांनी आज २३ जानेवारी २०२५ ला पाच वर्ष चा आढावा दिला.त्यांनी नगरपंचायत येथे पत्रकार परिषद घेऊन. पाच वर्षात केलेल्या कामा चा लेखा जोखा सांगितला, पत्रकार परिषद मध्ये ते सांगत होते की, त्यांनी ढाणकी नगर पंचायतच्या विकासासाठी अथक परिश्रम घेतले आहे. कोरोना काळात नगरपंचायत कर्मचाऱ्यांना वेळेवर मानधन दिला आहे. गावासाठी आठ ट्रान्सफॉर्मर बसून गावातील लोकांना होणाऱ्या वोल्टेज त्रासाचे निवारण लावले. पाणी, रस्ते व आरोग्यासाठी पाठपुरावा केला. महाविकास आघाडी ने जल संधारण नाला योजनेचे बंद केलेले काम पुन्हा जल संधारण नाला योजना चालू करून ८ कि.मी पर्यंत केला. ५७२ घरकुल मंजूर करून दिले.



तसेच गावाला डम्पिंग ग्राउंड नसताना, ढाणकी नगरपंचायत ला १५एकर जागा तसेच पाणी फिल्टर प्लॅन साठी ५एकर जागा उपलब्ध करून दिली. सोलर प्लॅन्ट चालू होण्याच्या मार्गांवर आहे. तसेच मी माझ्या पाच वर्षाच्या कार्यकाळात नगर पंचायतला तीन ट्रॅक्टर, तीन घंटा गांडी, एक ऍम्ब्युलन्स, एक अग्निशमन चार चाकी गाडी व अग्निशमन मोटर सायकल असे वाहने उपलब्ध करून दिले .ढाणकी गावाला आपला दवाखाना उपलब्ध करून दिला आणि पोलीस स्टेशन चा प्रस्ताव मंजूर झालेला असून ते लवकरच चालू होईल असे पत्रकार परिषद घेऊन ढाणकीतील सर्व पत्रकार संघटनाला आमंत्रीत करून त्यांनी सांगिले. यावेळी माजी आमदार नामदेव ससाणे, भा. ज. पा जिल्हा समन्वयक नितीन भूतडा, ढाणकी नगर अध्यक्ष सुरेश जयस्वाल, आनंदराव चंद्रे, दत्त दिगांबर वानखेडे, महेश पिंपरवार, बाळासाहेब गंधेवार, संतोष पुरी, साईनाथ मंतेवाड, गोविंद मिटकरे, सर्व नगरपंचायत कर्मचारी आणि गावातील मंडळी उपस्थित होते.

## वसईच्या दाट लोकवस्तीत बिबट्याचा वावर, बाईकस्वारावर हल्ला

**मुंबई/प्रतिनिधी :** वसईकरांना सावध करणारी एक बातमी समोर येत आहे. वसई पूर्वेकडील भोईदापाडा परिसरात एका बिबट्याचा वावर असल्याचे उघड आले आहे. बिबट्याच्या हल्ल्यात एक बाईकस्वार थोडक्यात बचावला आहे. २१ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली असून शाहरु खान असं या बाईकस्वाराचे नाव आहे. या प्रकरणी वालीव पोलिस अधिक तपास करत आहेत.

बाईकस्वार शाहरुख खान घरी परतत असताना त्याच्यावर बिबट्याने हल्ला केला. बिबट्याच्या हल्ल्यानंतर शाहरुख बाईकवरुन खाली कोसळला. तेव्हा त्याने मदतीसाठी आरडा ओरडा सुरू केला. तेव्हा मदतीसाठी आलेल्या सुरक्षा रक्षकांचा आवाज एकून बिबट्याने तिथून धुम ठोकली. त्यामुळं त्याचा जीव वाचला आहे.

गावकऱ्यांना हा प्रकार समजल्यानंतर आता परिसरात बिबट्याविषयी दहशत माजली आहे. कारण जिथे बिबटा दिसला होता तो रस्ता अनेकदा गावकरी वापरतात. त्यामुळं त्यांच्या मनात भीती बसली आहे. आता बिबट्याचा वावर जाणून कुठन कुठपर्यंत आहे याचा शोध घेतला जात आहे. बिबट्याच्या पायाचे ठसे पाहून शोध सुरू करणार आहेत.

## पुण्यातील कार्यक्रमातील अजित पवारांची ती मागणी शरद पवारांनी केली मान्य; नेमकं काय घडलं?

**पुणे/प्रतिनिधी :** आज पुण्यात वसंतदादा शुगर इंस्टीट्यूटची ४७वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि पारितोषिक समारंभ आज पार पडली आहे. या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, शरद पवार, दिलीप वळसे पाटील यांच्यासह अन्य नेते उपस्थित आहेत. यावेळी बोलताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी शेतकऱ्यांना, कारखान्याच्या चालकांना आणि संबधितांना काही अडचण आल्यास मला संपर्क साधा. त्याचबरोबर संस्था व्यवस्थित चालवण्यासाठी संस्था आणि सरकारमध्ये व्यवस्थित समन्वय असण्याची गरज आहे, असं म्हणत म दतीची ग्वाही दिली आहे. त्याचबरोबर अजित पवारांनी यावेळी बोलताना शरद पवारांकडे एक मागणी केली होती. उत्कृष्ट कामगीरी करणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षिसाची रक्कम दहा हजार रुपये दिली जाते ती वाढवावी असं अजित पवारांनी म्हटलं होतं ती मागणी शरद पवारांनी त्याच कार्यक्रमामध्ये मान्य केली आहे.

अजित पवारांची मागणी काय?

कार्यक्रमामध्ये बोलताना अजित पवार म्हणाले, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शेतकऱ्यांना बक्षिसाची रक्कम दहा हजार रुपये दिली जाते. आज दहा हजारला फारशी किंमत उरलेली नाही. त्यामुळे ती रक्कम एक लाख रुपये करण्याची मी विनंती करतो. अर्थात वाढ कधी करायची याचा निर्णय शरद पवार घेतील, अशी मागणी यावेळी अजित पवारांनी यावेळी केली आहे. ही मागणी शरद पवारांनी मान्य केली आहे, त्यांनी अजित पवारांच्या भाषणानंतर त्यांच्या भाषणात याबाबतची वाढ केल्याची माहिती दिली.

शरद पवार काय म्हणाले?

आतापर्यंत वैयक्तीक कामगिरीबद्दल संस्थेकडून दिले जाणारे पुरस्कार दहा हजार रुपयांचे होते. आजपासून त्यांची रक्कम वाढवून एक लाख रूपये असेल. अंबालिका साखर कारखान्याला देण्यात येणाऱ्या पुरस्काराची रक्कम दोन लाख होती ती आता पाच लाख रूपये असेल. अजित पवारांनी भाषणात वैयक्तिक पुरस्कारांची रक्कम दहा हजार वरून वाढवून एक लाख करण्याची मागणी केली होती. शरद पवारांनी ही मागणी लगेच मान्य केली. त्याचबरोबर अजित पवारांच्या अंबालिका या खाजगी कारखान्याला बक्षीसाची रक्कम वाढवून दोन लाखांवरुन पाच लाख रुपये देण्यात येईल असे जाहीर केले आहे.

अजितदादा शरद पवारांच्या शेजारी बसणार होते, पण...

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी शरद पवारांच्या बाजूला बसण्याचं टाळलं. आधी जी बैठक व्यवस्था करण्यात आली होती, त्या बैठक व्यवस्थेत अजित पवार हे शरद पवारांच्या शेजारी बसणार होते. मात्र, आता त्यांच्या जागी सहकारमंत्री बाबासाहेब पाटील बसले आहेत. बाराम तीत कृषी प्रदर्शनामध्ये देखील हे दोन्ही एकत्रित एकाच व्यासपिठावरती आले होते. मात्र, त्यावेळी देखील शरद पवार आणि अजित पवार यांनी एकमेकांना इग्नोर केल्याचं पाहायला मिळालं होतं. आज देखील या कार्यक्रमामध्ये दोन्ही नेत्यांनी एकमेकांच्या बाजुला बसण्याचं टाळलं असल्याचं दिसून येत आहे.

## हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची वक्तृत्वशैली, नेतृत्व, विचारांची शिकवण आजही मार्गदर्शक ठरत आहे : शिवसेना नेते केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची ज्वलंत वक्तृत्वशैली, कार्यक्षम नेतृत्व, दृढनिश्र्चय आणि महाराष्ट्रासाठीची निष्ठा लाखो लोकांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. त्यांच्या विचारांची शिकवण आणि योगदान आजही मार्गदर्शक ठरत आहे असे प्रतिपादन शिवसेना नेते तथा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केले

हिंदुहृदयसम्राट श्री बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त आज मुंबई येथील पक्ष कार्यालय येथील वंदनीय बाळासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करत त्यांना अभिवादन केले. त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते ते पुढे म्हणाले की बाळासाहेब ठाकरे हे केवळ एक व्यक्ती नव्हते, तर ते एक चळवळ होते. मराठी माणसाच्या हक्कांसाठी त्यांनी सुरू केलेल्या शिवसेना या चळवळीने सामान्य लोकांना आवाज दिला आणि त्यांच्या समस्यांना वाचा फोडली.







त्यांच्या नेतृत्वाने सामाजिक परिवर्तनाची मोठी चळवळ उभारली, ज्याचा प्रभाव आजही कायम असल्याचे मत शिवसेना नेते तथा केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केलले पक्ष कार्यालयात झालेल्या अभिवादन कार्यक्रमाला शिवसेना नेते आनंदरावजी अडसूळ दादाजी भुसे तानाजी सावंत नीलम गोऱ्हे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी सदस्य शिवसैनिक उपस्थित होते तर सकाळीच केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी मुंबईतील कुलाबा येथील बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाला भेट देऊन पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

### शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जनसंपर्क कार्यालत शिवसैनिकांनी केली अभिवादन

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या बुलढाणा येथील जनसंपर्क कार्यालयातही शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त पुष्पमाल्य अर्पण करून शिवसैनिकांनी अभिवादन केले यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख गजेंद्र दांदडे बाळू घुड माजी नगराध्यक्ष विठ्ठल येवले माजी नगरसेवक दीपक सोनुने मनोज यादव निलेश राठोड सुभाष पवार तुषार सावजी यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते

# कृषी विभागातील आत्मा कर्मचाऱ्यांवर अन्याय यांचा वनवास संपणार कधी ?

## १४ वर्ष कृषी विभागात सेवा करून विविध प्रक्रिया उद्योगांचा लाभ यशस्वीपणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणाऱ्या कर्मचाऱ्यांना मात्र वेतनापोटी मिळणारा लाभ केला कमी

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** राज्याच्या कृषी विभागामध्ये केंद्र सरकारच्या कृषी योजना राबवण्यासाठी आत्मा म्हणजेच कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा मध्ये कृषी पदवीधर तरुणांना कंत्राटी तत्त्वावर घेण्यात आले. सुरुवातीला त्यांना देण्यात येणारे वेतन २०२१ पासून कमी करण्यात आले आहे. त्यांना कोणताही भत्ता मिळत नाही. अतिरिक्त काम केल्याचे मानधनही नाही. निवडणुकीच्या प्रचारात कृषी प्रगतीचे दाखल देणारे नेते त्यांच्याच तोंडाला पाने पुसत आहेत. शेतकरी आत्महत्याग्रस्त जिल्हा म्हणून ओळख असलेल्या बुलडाणा जिल्ह्यातील कृषी कर्मचाऱ्यांवरही अन्याय होत आहे.

आत्मा विभागात काम करणाऱ्या उच्चशिक्षित तरुणांच्या आत्म्याचा आवाज शासन ऐकणार का? असा सवाल कार्यरत कर्मचाऱ्यांनी उपस्थित केला आहे. शेतीला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन प्रगतीची गती वाढवावी या हेतूने आत्मा विभागांतर्गत कृषी अभ्यासक्रमातील बीएसस्सी आणि एमएस्सी पदवी घेतलेल्या तरुणांची कंत्राटी कर्मचारी म्हणून २०१० मध्ये भरती करण्यात आली. तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, सहायक तंत्रज्ञान व्यवस्थापक, संगणक अज्ञावली रुपरेषक या पदांवर हे कंत्राटी कर्मचारी काम करतात.

ज्यावेळी त्यांची नियुक्ती झाली त्यानंतर केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनानुसार आत्मा संचालक स्तरावरून ठरवून दिल्याप्रमाणे त्यांना प्रतिमहा ४० हजार रुपये वेतन देण्याचे निश्र्चित करून दरवर्षी १० टक्के वेतन वाढ देण्याचेही ठरवण्यात आले व तसे वेतन त्यांना अदा सुद्धा करण्यात आलेले होते. मात्र २०२१ मध्ये अचानकपणे तत्कालीन संचालक आत्मा यांनी कुठल्याही वरिष्ठ विभागाची मान्यता न घेता चार ओळींचे पत्र काढून त्यांचे वेतन वाढविण्याऐवजी कमी म्हणजे २९ हजार रुपये करण्यात आले व सोबतच १० टक्के वाढही बंद झाली. जर संचालक आत्मा यांना त्यांच्याच कार्यालयाने ठरवून दिलेल्या वेतन वाढीवर स्पष्टता नव्हती तर सर्व बाबी स्पष्ट होईपर्यंत निदान या कर्मचाऱ्यांचे वेतन जैसे थे ठेवायला काय हरकत होती ? सन २०१० मध्ये प्रवासासाठी लागणारा प्रवासभत्ता दिला जात आहे तोच २०२५ मध्ये सुद्धा कायम आहे मग संपूर्ण जगात महागाई वाढत असताना या कर्मचार्यांना त्या महागाईचा फटका बसत नसेल का ? असे अनेक संतप्त सवाल या कर्मचाऱ्यांचे आहे, याबद्दल त्यांनी वेळोवेळी विविध मार्गाने न्याय मागण्याचा प्रयत्न केला पण त्यांचेकडे सर्वांनी सोयीस्करपणे दुर्लक्ष च केले आहे. त्यांचे वर सन २०२१ पासून झालेल्या या अन्यायामुळे कर्जाचे हप्ते, घरगुती खर्च, मुलांचे शिक्षण, घरातील सदस्यांचे आजरपण , दवाखाना खर्च हे सगळे गणित बसवायचे कसे हा प्रश्र्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे. शेतकऱ्यांचे गट, कंपनी स्थापन करणे, प्रशिक्षण, शेतीशाळा, अभ्यासदौरे यांचे आयोजन करणे, याशिवाय परंपरागत कृषी विकास योजना राबविणे, डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजना राबवणे, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (WDC 2.0), प्रधानमंत्री अन्न प्रकिया योजना ( PMFME), तालुकास्तरावरील विस्ताराचे काम करणे सोबतच तालुका कृषी अधिकारी यांचे सांगणे वरून यांत्रिकीकरण, चखउक्र सह इतर विषय सांभाळणे, प्रत्यक्ष शेतावर जाऊन शेतकऱ्यांच्या समस्या सोडवणे, बियाणे, खते, खतांची मात्रा याबाबतची शास्त्रीय माहिती शेतकऱ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगणे आदी जबाबदाऱ्या त्यांच्याकडे असतात. इतक्या सर्व जबाबदाऱ्या सांभाळून सुद्धा वेतन कपातीच्या या अश्या अन्यायकारक गोष्टीमुळे जो पर्यंत त्यांचे वेतन पूर्ववत होत नाही व २०२१ पासून कमी केलेल्या वेतनाचा फरक मिळत नाही तो पर्यंत या आत्मा कर्मचाऱ्यांनी आत्मा योजने व्यतिरिक्त इतर योजनांचे अतिरिक्त कामे न करण्याचा निर्णय घेतला आहे.



### आत्मा योजने व्यतिरिक्त इतर योजनांचे अतिरिक्त कामे न करण्याचा निर्णय

जिल्ह्यात १८ आत्मा कर्मचारी कार्यरत आहेत, गेली १४ वर्षे कृषी विभागात सेवा केल्यानंतर वरिष्ट कार्यालयाने असे अचानकपणे कुठलीही स्पष्टता नसतांना केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांचे वेगवेगळे अर्थ काढून आमचे वेतन कमी करणे हे संयुक्तिक नाही. जे वेतन कमी करण्यासाठी कुठलीही मान्यता घेतली नाही आता ते वेतनवाढ पूर्ववत करायला आमचा प्रस्ताव गेल्या वर्षभरापासून मंत्रालय स्तरावर प्रलंबित आहे. वास्तविक ज्या ठिकाणाहून वेतनवाढ कमी झाली त्याच ठिकाणाहून ती पूर्ववत करण्याबाबत तत्कालीन कृषी मंत्री यांचे पत्र आलेले असताना सुद्धा आमची वेतनवाढ अश्या पद्धतीने प्रलंबित राहणे म्हणजे या कर्मचाऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्या सारखा प्रकार होत आहे. यासाठीच आता आम्हाला नेमून दिलेल्या कामाव्यतिरिक्त अन्य कोणतेही काम, योजना राबवणे आम्ही करणार नाही.

**–श्री.योगेश पडोळ**
**तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक, आत्मा**

### ही गुणवत्तेची उपेक्षा, आत्मा कर्मचाऱ्यांना न्याय मिळायलाच हवा

देशात अन्य राज्यांत आत्माच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मानधन कमी केलेले नाही. केवळ महाराष्ट्रातच कमी केले आहे. ही गुणवत्तेची उपेक्षा आहे. लोकप्रतिनिधींनीही या प्रश्र्नाकडे दुर्लक्ष केले आहे. केंद्र सरकारच्या विविध प्रकल्पांचे काम सुरुवातीच्या टप्प्यात याच कंत्राटी कर्मचाऱ्यांनी केले. त्यामुळे या योजना, प्रकल्प याचा लाभ लाभार्थी शेतकऱ्यांना मिळाला. त्यांच्या वेतन वाढीबाबतचा प्रस्ताव मंत्रालयात स्तरावर आहे. तसेच त्याचा पाठपुरावाही सुरू आहे.

**–श्री.पुरुषोत्तम उन्हाळे,**
**प्रकल्प संचालक, आत्मा बुलडाणा**

## विविध वृत्त...

### नागपुरात एक सक्करदरा तर दुसरी वाठोडा हद्दीत हत्या; पोलिसांनी आरोपींना ठोकल्या बेड्या



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :**नागपुरात आज सकाळी दोन हत्येची घटनेनी एकच खळबळ उडाली होती, वाठोडा आणि सक्करदरा मध्ये ही घटना उघडकीस आली. वाठोडा जुन्या व्यमन्यस मध्ये ऐका आरोपी जो जामीन वर आला होता त्याची हत्या करण्यात आली तर सक्करदरा मध्ये प्रॉपर्टीच्या वादातून हत्या करण्यात आली.सक्करदरा पोलिसांनी ऐका आरोपींना जेर बंद केले तर वाठोडाची हत्येच्या चार ही आरोपींना पोलीस बेड्या थोठावल्या. पुढील तपास पोलीस करीत आहे.

### 'त्या' बालकांच्या पालकांनी संपर्क करण्याचे आवाहन


दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अभिषेक पडवळ या एक वर्षाच्या बालकाला त्यांच्या नातेवाईकांनी बाल कल्याण समितीकडे दि. ९ नोव्हेंबर रोजी सुपूर्त केले. तेव्हापासून बालकाला यशोधाम लव्ह ट्रस्ट फॉर इंडियन चिल्ड्रेन बुलढाणा येथे ठेवण्यात आले असून बालकाच्या पालक व रक्तसंबधातील नातेवाईकांनी अद्यापर्यंत संपर्क साधला नाही. सदर बालकाच्या पुनर्वसनासाठी दत्तक विधान मुक्त करणे आवश्यक असल्याने बालकाच्या रक्तसंबंधातील नातेवाईकांनी ३० दिवसाच्या आत संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे यांनी केले आहे.



बालक नामे साई ऊर्फ अभिषेक पडवळ या बालकाला त्यांची काकू नामे वंदना हरसिंग पडवळ रा. नागझरी ता.खामगाव यांनी बाल कल्याण समितीकडे स्वाधीन केले होते. या बालकाला बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार यशोधाम, दि लव्ह ट्रस्ट फॉर इंडियन चिल्ड्रेन इन नीड बुलढाणा येथे दाखल करण्यात आले. दाखल केल्यापासून या बालकाची विचारपूस, सांभाळण्यासाठी किंवा ताबा घेण्यासाठी कोणीही आलेले नाहीत. सदर बालकाचे पुनर्वसनासाठी दत्तक विधान मुक्त करणेकरिता विधी मुक्त करणे आवश्यक असल्याने बालकाचे कोणी रक्तसंबंधातील नातेवाईक असल्यास त्यांनी ३० दिवसाच्या आत यशोधाम दि लव्ह ट्रस्ट फॉर इंडियन चिल्ड्रेन इन नीड, खामगाव रोड, सेंट जोसेफ स्कुल जवळ, सुंदरखेड ता.जि.बुलढाणा या संस्था येथे किंवा सामाजिक कार्यकार्ता रामेश्र्वर जाधव यांच्या मोबाईल क्र. ९५५२२०६५०३ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### बुलढाण्यात अतिक्रमणावर पालिकेची धडक कारवाई





दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा पालिकेने रस्त्यावरील अतिक्रमणावर कारवाईसाठी आज सकाळपासून प्रत्यक्ष अंमलबजावणीला सुरुवात केली आहे. इकबाल चौकातील नोझलच्या जागेवर आणि रोडवर तीन मीटर रस्त्यावरील अतिक्रमणावर बुलढाणा नगरपालिका प्रशासनाने धडक कारवाई करत अतिक्रमणे, दुकानांसमोरील फ्रंट मार्जिन, शेडसह अनधिकृत बांधकामे हटविली आहेत. रस्त्यांवरील अतिक्रमणांमध्ये वाढ झाल्यामुळे एका मुलाचा जीव सुद्धा गेला होता त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार आज हे अतिक्रमण काढण्यात आले आहे तर अतिक्रमण वाढल्यामुळे पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन रस्त्यांवरून चालावे लागत होते. तसेच शहरातील जिल्हाधिकारी चौक संगम चौक आणि जयस्तंभ चौकातील अतिक्रमण सुद्धा काढण्यात येणार असल्याची माहिती बुलढाणा नगरपालिकेचे मुख्याधिकारी गणेश पांडे यांनी दिली आहे.

### ई-पिक पाहणीसाठी २८ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी करा; जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्प ई–पिक पाहणीची सुरुवात दि. १ डिसेंबरपासून सुरू झाली आहे. सातबारावर पिकपेरा स्वतः शेतकऱ्यांनी ॲन्ड्राईड फोनद्वारे नोंदणी करण्यासाठी १५ जानेवारीपर्यंत होता. सहायक स्तरावरील ई–पिक पाहणी नोंदणी दि. २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सुरु राहणार आहे. तरी सर्व शेतकरी बांधवांनी डिसीएस सहायकांकडून पीकांची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केली आहे.

रब्बी हंगामी २०२४ ई–पिक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यात आजरोजी पर्यंत ७ लाख ५६ हजार ५३९ हे. आर. क्षेत्रापैकी २ लाख ५३ हजार ५५१ हे. आर क्षेत्रावर, तसेच एकूण ८ लक्ष ३६ हजार ०३७ पिक पाहणी करावयाच्या खातेदारापैकी २ लक्ष ४६ हजार ६७९ प्लॉटवर सबंधित शेतकऱ्यांनी आपल्या पीकांची ई–पीक पाहणी डिसीएस व्हर्जन ३.० या मोबाईल पद्वारे सातबारावर नोंदणी केलेली आहे. आजवर बुलढाणा जिल्ह्यात डिजीटल क्रॉप सर्वे अंतर्गत ई पीक पाहणीची नोंदणी ३३.५१ टक्के क्षेत्रावर झोलेली आहे. उर्वरित क्षेत्रावर सर्व शेतकरी बांधावांना ई–पीक पाहणी पद्वारे पीकांची नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

ई पीक पाहणी द्वारे पीकांची नोंदणी न केल्यास आपल्या सातबारा वर पीक पेरा कोरा राहील. जो नंतर भरता येत नाही त्यामूळे पीक विमा व इतर शासकीय अनुदान व लाभ मिळविण्यास अडचण निर्माण होईल. अवेळी पाऊस किंवा इतर नैसर्गीक आपत्ती या बाबत पिक विमा मिळण्यासाठी सातबारा वर अचूक पीक नोंद असणे आवश्यक आहे.

### नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आझाद हिंद सेनेचे सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस आणि शिवसेना या राजकीय पक्षाचे संस्थापक व प्रसिद्ध व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार, उपजिलहाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, समाधान गायकवाड तसेच अधिकारी–कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### २५ जानेवारीला मॉडेल डिग्री येथे मराठी भाषा पंधरवडा निमित्य मार्गदर्शन शिबीराचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :**मराठी भाषा विभाग आणि मॉडेल डिग्री कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २५ जानेवारीला मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त ३६ जिल्हे ३६ मार्गदर्शन सत्रेअंतर्गत एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे

मराठी भाषेचे संवर्धन आणि जतन करण्याच्या दृष्टिकोनातून मराठी भाषा विभागाच्या वतीने राज्यभर ३६ जिल्हे ३६ मार्गदर्शन सत्रे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे बुलढाणा येथे हे सत्र आयोजित करण्याचा बहुमान बुलडाणा येथे मॉडेल डिग्री कॉलेजला मिळाला आहे त्यांनिमित्य एका कार्यक्रमाचे आयोजन २५ जानेवारीला करण्यात आले आहे या कार्यक्रमा दरम्यान मराठी भाषा आणि रोजगाराच्या संधी या विषयावर तज्ञ मार्गदर्शन करणार आहे या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ साहित्यिक व मराठी भाषेची अभ्यासक रमेश इंगळे उत्रादकर उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक प्राचार्य डॉ अण्णासाहेब म्हळसने उपस्थित राहणार आहेत या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी आणि साहित्यप्रेमींनी उपस्थित राहावे असं आवाहन मराठी भाषा विभागाचे अप्पर मुख्य सचिव मनीषा पाटणकर – म्हैसकर भाषा संचालक विजया डोनीकर , मॉडेल डिग्री कॉलेज येथील मराठी विभागाचे भ प्राध्यापक डॉ किं वा वाघ आणि डॉ मनीषा राऊत यांनी केला आहे .

### नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे जयंती साजरी

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** २३ जानेवारी नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा जन्मदिवस त्यांची नेताजी जयंती म्हणून ही साजरी केली जाते. विद्यार्थ्यांमध्ये समर्पण, प्रामाणिकपणा आणि लढ्याची भावना जागृत करण्यासाठी काँग्रेस चे सक्रिय कार्यकर्ते शे. साजिद शे. महमद यांनी स्व. थावराजी नाईक निवासी दिव्यांग विद्यालय ढाणकी येथे साजरी केली . विशेष संमेलनाची सुरुवात सुभाषचंद्र बोस व हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेला पुष्प माळ अर्पण करून अभिवादन करण्यात आले. शे अनिश यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनाविषयी सर्वांना माहिती दिली. सुनील मांजरे यांनी प्रेरणादायी शब्दांनी त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.त्यानंतर विध्यार्थ्यांना फराळ देण्यात आला .यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष पत्रकार विनोद गायकवाड होते , व कार्यक्रमाचे आयोजक शे. साजिद शे. महमद,शाळेतील सर्व विद्यार्थी आणि शिक्षक वर्ग, युवा ग्रामीण पत्रकार संघ ढाणकी सर्व पत्रकार, संभाजी गोरटकर , एजास पटेल ता, शेख आनीस( नेताजी सुभाष चंद्र फॉरवर्ड ब्लॉग ता. उपाध्यक्ष),घोडे मॅडम, अमीन शेख, शाहरुख भाई, सुनील मांजरे, साहेबराव वाघमोडे ,शेख महेबुब शेख सुलेमान, अशोक गायकवाड (कोब्रा) अजीज खान,बंटी फुलकोंढवार , शेख इरफान शेखजी, अनीस, रियाज, इत्यादी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता शाळेचे मुख्याध्यापक पाईकराव सर यानी केली.



# शंकरपटात बच्चू कडू यांनी सुसाट वेगाने हाकली बैलजोडी

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** विदर्भातील सर्वात मोठी बहिरम यात्रेनिमित्त बैलगाडा शर्यतीचं आयोजन करण्यात आलं होतं. यात्रेनिमित्त माजी मंत्री बच्चू कडू यांनी भव्य शंकरपटाचं आयोजन केलं. यावेळी बच्चू कडू यांनी स्वतः बैलजोडी घेऊन शंकरपटात सहभागी होऊन अगदी धूरकरी प्रमाण अवघ्या ६.९९सेकंदात पल्ला गाठला. अतिशय सुसाट वेगाने बच्चू कडू यांनी धुरकरीपेक्षा बैलजोडी हाकली,बच्चू कडूंचा बैलगाडी शर्यत अवघ्या काही सेकंदातच शर्यतीचा पल्ला गाठला. बच्चू कडू यांनी ६.९९सेकंदात बाजी मारलेली पाहून अनेकांनी त्यांचं कौतुक केलं. यावेळी हजारो लोकांना बच्चू कडू यांनी संबोधित केलं, ही ५६ इंचाची छाती नाही तर शेतकऱ्यांच्या मुलाची छाती आहे बैल जोडी आवरत नव्हती इतकी सुसाट पळाली हम चलते तो चिता की रफ्तार से चलते. रोकने की तुम्हारी औकात नही थी तुम्ही बेइमानी केली म्हणून मी हरलो हे मताचे चोर आहे तर बच्चू कडू थांबत नाही आणखी ताकतीन आम्ही धावणार शेतकरी व शेतमजुरांसाठी आम्ही लढतोय तर आमचं प्रत्येक रक्त हे शेतकऱ्यांसाठी आहे असं बच्चू कडू म्हणाले



